# 'सीबीआय'चा शक्तिक्षय

*'सीबीआय'चा कर्मचारीवर्ग सुशासनाच्या तत्त्वांना प्रतिबद्ध राहाण्याबाबत किती सक्षम आहे, यावर त्या संस्थेची विश्वासार्हता अवलंबून आहे.*

केंद्रीय अन्वेषण विभागाचा (सीबीआय: सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन) शेवट जवळ आला आहे. एकेकाळी भारतातील 'प्रमुख तपास संस्था' म्हणून नावाजली जाणारी सीबीआय आता आतून-बाहेरून जर्जर झाली आहे. मुख्यत्वे संचालक आलोक वर्मा व विशेष संचालक आर. के.अस्थाना यांच्यातील हाडवैरातून उद्भवलेल्या असंतोषाचा स्फोट होऊन आरोप-प्रत्यारोपांची विकृत व निर्लज्ज स्पर्धा सुरू झाली आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालय, पंतप्रधान कार्यालय, केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हे सगळेच ओढले गेले आहेत. फारशा प्रिय नसलेल्या (पण काही वेळा आवश्यक ठरलेल्या) संस्थेचा कुजलेला गाभा या निमित्ताने उघड्यावर आला आहे.

पण सीबीआयची विद्यमान अव्यवस्था केवळ वर्मा व अस्थाना यांच्यातील गुप्त कारस्थानांमुळे झालेली नाही किंवा नरेंद्र मोदी सरकारच्या अनिष्ट क्लृप्त्यांमुळेही झालेली नाही. गढूळलेल्या नोकरशाहीमध्ये या अव्यवस्थेची मुळं रुतलेली आहेत ('नरेंद्र कुमार विरुद्ध भारतीय संघराज्य' या खटल्यात २०१३मध्ये गुवाहाटी उच्च न्यायालयाने याकडे निर्देश केला होता) आणि या संस्थेचं नियमन १९४६ सालच्या एका दुबळ्या कायद्याद्वारे होतं हाही मुद्दा या अनागोंदीला कारणीभूत आहे. न्यायालयांनी वारंवर टोचल्यामुळे, उद्युक्त केल्यामुळे व पाठपुरावा केल्यामुळे त्या-त्या वेळच्या सरकारला सीबीआयच्या कामकाजात सुधारणा करणं भाग पडलं, अन्यथा तेवढाही बदल झाला नसता. झालेल्या 'सुधारणा'ही अर्ध्यामुर्ध्या स्वरूपाच्या व काही वेळा कुहेतूने प्रेरित झालेल्या होत्या. उदाहरणार्थ, उच्च-पदस्थ नोकरशहांचा साधा तपास सुरू करण्यापूर्वी सरकारची संमती बंधनकारक ठरवणारी तरतूद करण्याचे अनेक प्रयत्न झाले, ते याच कुहेतूंचे निदर्शक आहेत.

सीबीआयमध्ये अशा प्रकारे राजकीय हस्तक्षेप होऊ नये, यासाठी न्यायालयांनी अनेक वर्षं प्रयत्न करून पाहिले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. केंद्रीय दक्षता आयोगाला सीबीआयच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याचे अधिकार देणं किंवा नियुक्त प्रक्रियेमध्ये द्विपक्षीयता आणण्याचा प्रयत्न करणं, या न्यायालयांनी सद्हेतूने केलेल्या कृती होत्या. पण सीबीआयच्या प्रत्यक्ष तपासक्षमतेमध्ये फारसा रस नसलेल्या आणि राजकीय कारस्थानांसाठी अस्त्र म्हणून या संस्थेचा वापर करू इच्छिणाऱ्या वेळोवेळच्या सरकारांनी या सूचना बासनात गुंडाळून ठेवल्या.

या अनागोंदीचा दोष अनेक सरकारांकडे जातो. केंद्र सरकार सीबीआयचा उघड पक्षपाती वापर करत आहे, याकडे प्रत्येक पक्ष विरोधी बाकांवर बसलेलं असताना (योग्य) निर्देश करतो. पण सत्तेत आल्यावर प्रत्येक पक्ष हाच वापर सुरू ठेवतं. आंध्र प्रदेशातील तेलुगू देसम पक्षाच्या सरकारने आपल्या राज्यात सीबीआयच्या कारवायांना असलेली सार्वत्रिक संमती नोव्हेंबर २०१८मध्ये काढून घेतली, हा याचा उत्तम दाखला होता. हा पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा भाग होता, तेव्हा राज्यातील विरोधक नेत्यांचा छळ

करण्यासाठी सीबीआयचा वापर करण्यात त्याला काही गैर वाटलं नाही. आता केंद्र सरकारच्या मर्जीतून उतरल्यानंतर या पक्षाला अचानक सीबीआयचा गैरवापर होत असल्याची जाणीव झाली.

आंध्र प्रदेश सरकारची कृती अभूतपूर्व नाही. इतर राज्य सरकारांनीही पूर्वी सीबीआयच्या कारवाईला असलेली संमती काढून घेतलेली आहे. विशेषतः मुख्यमंत्री व राज्य मंत्रिमंडळाचे सदस्य सहभागी असलेल्या राजकीयदृष्ट्या संवेदनशील खटल्यांमध्ये अशी पावलं उचलण्यात आलेली आहेत. राज्य पातळीवरील नेत्यांनी आपल्यासमोर मान डोलवावी, यासाठी केंद्रीय सरकार अनेकदा सीबीआय कारवाईची धमकी देतं- विशेषतः संसदेत पूर्ण बहुमत असलेलं केंद्र सरकार हा मार्ग अनेकदा वापरतं. परंतु, मुळात देशभरातील राज्य पोलिसांच्या अकार्यक्षमतेने सीबीआयच्या लोकप्रियतेला अंशतः हातभार लावलेला आहे, हे अनेकदा नमूद केलं जात नाही. सीबीआयच्या माध्यमातून केंद्र सरकार आपल्या कामकाजात हस्तक्षेप करत असल्याची तक्रार करणाऱ्या राज्य सरकारांनी व पक्षांनी आत्मपरीक्षणसुद्धा करायला हवं. अधिकाधिक महत्त्वाची प्रकरणं न्यायालयं सीबीआय व राष्ट्रीय तपास संस्थेकडे का सुपूर्द करत आहे, याचा विचार या मंडळींनी करायला हवा.

भारतभरातील पोलीस दलांच्या व्यापक अकार्यक्षमतेचं प्रतीक म्हणून सीबीआयच्या सद्यस्थितीकडे पाहता येतं- पुरेशी साधनसामग्री नसलेली, पुरेसा कर्मचारीवर्ग नसलेली आणि कमी किंवा शून्य स्वातंत्र्य असलेली ही दलं आहेत. सीबीआयच्या अधिकाऱ्यांचं स्वतंत्र केडर नसतं; राज्य केडरमधील पोलीस अधिकाऱ्यांमधूनच काहींची नियुक्ती या तपाससंस्थेवर केली जाते. आवश्यक तेवढी सक्षम न्यायवैद्यकीय यंत्रणा सीबीआयकडे अजूनही नाही. शिवाय, या संस्थेकडे तपासाला येणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या प्रकरणांचा तपास करण्यासाठी त्या विषयानुसार कुशलता असावी, त्याबाबतीतही स्रोतांची भयानक वानवा आहे.

उच्चपदस्थ पातळीवरील भ्रष्टाचाराचा निःपक्षपाती तपास करण्यासाठी आणि अती महत्त्वाच्या, आंतरराज्यीय, सीमापार वा राजकीयदृष्ट्या संवेदनशील प्रकरणांचा तडा लावण्यासाठी स्वतंत्र संस्थेची गरज आहे, यात काही वाद नाही. या सर्व पातळ्यांवर सीबीआयची कामगिरी अर्धवट स्वरूपाची राहिलेली आहे. अतिशय गाजलेल्या टू-जी घोटाळ्यातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाली. या प्रकरणातील तपासात नक्की कोणत्या त्रुटी राहिल्या याचं कठोर आत्मपरीक्षण व तपास व्हायला हवा होता. या तपासावर सर्वोच्च न्यायालय स्वतः देखरेख करत होतं आणि तत्कालीन केंद्र सरकारच्या निवडणुकीतील पराभवाला हे प्रकरण मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरलं होतं. कथितरित्या सीबीआय अधिकाऱ्यांच्या छळामुळे बन्सल कुटुंबियांनी आत्महत्या केल्याचं प्रकरणही या संस्थेसाठी धोक्याची घंटा वाजवणारं होतं. पण या परिस्थितीवर उपाय करण्यासाठी कोणतीही महत्त्वाची पावलं उचलण्यात आली नाहीत.

सीबीआय आहे त्या स्थितीमध्ये त्यात कोणतीही 'दुरुस्ती' शक्य नाही. तपासप्रक्रियेवर प्रभाव टाकल्याचा आरोप झालेले आलोक वर्मा हे सीबीआयचे अलीकडच्या काळातील तिसरे संचालक आहेत. केंद्र सरकारने वर्मा यांच्यावर निलंबनाची कारवाई केल्यानंतर या कारवाईची कायदेशीरता निःपक्षपातीपणे व तटस्थपणे तपासण्याचा प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने केला, पण केंद्र सरकार व त्यांच्या अधिकाऱ्यांवरील सनसनाटी आरोपांमुळे हा प्रयत्न झाकोळला गेला. या गोंधळात माध्यमांमधील समांतर सुनावणीने भर घातली. वर्मा यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने कोणताही निर्णय दिला तरी त्यातून सीबीआयवर लोकांचा विश्वास किंवा संस्थांतर्गत मनोबळ पुनर्स्थापित होण्याची शक्यता नाही. शिवाय, सीबीआयकडून

अभिप्रेत असलेलं काम व्हावं यासाठी आवश्यक संस्थात्मक सुधारणा सुचवून त्यांचा पाठपुरावा केला जाण्याचीही शक्यता नाही.

या संकटकाळातच अधिक चांगली तपाससंस्था निर्माण करण्याची संधीही आहे. कार्यक्षम व घटनात्मक पद्धतीनं कार्यरत राहणारी, राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त असलेली आणि केवळ तिच्या कामकाजाचं नियमन करणाऱ्या सक्षम कायद्याचा वचक असलेली, तपासात विश्वासार्ह निःपक्षपातीपणा राखणारी व महत्त्वाच्या गुन्ह्यांचा तपास करून त्यासंबंधी कारवाई करण्याची क्षमता असलेली ही संस्था असायला हवी. राजकीय वर्ग ही संधी वाया घालवणार नाही, अशी आपण केवळ आशा करू शकतो.

●

## ऐक्याच्या आदर्श आशयाचा ऱ्हास

*भारतीय जनता पक्षाच्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' प्रकल्पाद्वारे राज्यसंस्था व कॉर्पोरेट क्षेत्र यांच्यातील आश्रयदातृत्वाच्या संबंधांवर पुन्हा शिक्कामोर्तब झालं आहे.*

भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाने जागतिक राजकीय अवकाशात देशाची नाचक्की केली आहे. 'सहाशे फुटांच्या या निर्मितीमधून भारताच्या जागतिक आकांक्षा उघड होतातच, आणि तितक्याच प्रमाणात देशाच्या नेत्याचा राजकीय अहंकारही यातून दिसून येतो,' अशी टिप्पणी 'वॉशिंग्टन पोस्ट'ने केली आहे. पुतळा बांधण्यावर इतका प्रचंड खर्च करणाऱ्या देशाला विकासात्मक सहकार्य करणं निरर्थक आहे, असं मत ब्रिटिश संसदसदस्य पीटर बोन यांनी व्यक्त केलं. या अवाढव्य प्रकल्पावर भारताने ४३ कोटी पौंड खर्च केले, त्याच काळात समांतरपणे ब्रिटिश सरकारकडून १.१ अब्ज पौंड मदतही भारत सरकारने घेतली- ही मदत मुख्यत्वे सामाजिक क्षेत्रासाठी वापरण्याकरिता होती. देशातील अंतर्गत घडामोडींचा विचार केला, तर या पुतळ्यावरून केवळ 'अधिकृत' पातळीवर आनंदोत्सव सुरू आहे. पण सर्वसामान्य नागरिक- विशेषतः विस्थापित आदिवासी गावकरी उद्विग्न झालेले आहेत. तरीही, हा पुतळा म्हणजे 'भारताच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उमटवणाऱ्या सर्वांना दिलेलं प्रत्युत्तर आहे', 'आपल्या अभियांत्रिकी व तांत्रिक ताकदी'चं प्रतीक आहे आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे 'देशाला दिलेली भेट' आहे, अशा मोदींच्या या संदर्भातील भावना आहेत. या सगळ्यासाठी देशाला प्रतिबंधात्मक (बुडित) खर्चाशी जखडून ठेवण्यात आलं आहे.

पण खरी किंमत किती आहे, हे कोणाला नीटसं माहीत आहे का? विविध दस्तावेजांची तुलना केल्यानंतर असं दिसून आलं की, या पुतळ्यावरील खर्चाची जाहीर करण्यात आली रक्कम प्रत्यक्षातील खर्चापेक्षा खूपच कमी आहे. या प्रकल्पासाठी एकूण २,९८० कोटी रुपये खर्च आल्याचं प्रसारमाध्यमांमधून वारंवर बोललं जातं आहे. वास्तविक २०१४-१५पासून आजपर्यंत एकट्या राज्य सरकारलाच पुतळ्यासाठी एवढा खर्च आला आहे, असं राज्य सरकारच्या अर्थसंकल्पीय कागदपत्रांवरून स्पष्ट होतं. त्याचप्रमाणे केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीत सदर पुतळ्यासाठी ३०९ कोटी रुपयांची वेगळी तरतूद करण्यात आली आहे. 'इंडिया टुडे'ला दिलेल्या मुलाखतीत (९ नोव्हेंबर २०१८) सरदार सरोवर नर्मदा निगम लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक संदीप कुमार यांनी आणखी ५५० कोटी रुपयांचा उल्लेख केला. केंद्रीय व राज्य पातळीवरील सार्जनिक क्षेत्रातील कंपन्या, खाजगी कंपन्या व व्यक्तींनी दिलेल्या वर्गणीतून ही रक्कम उभी राहिल्याचं कुमार

म्हणाले. या तीनही स्रोतांची बेरीज केली, तर कागदोपत्री सिद्ध करता येईल असा एकूण खर्च ३,८३९ कोटी रुपयांपर्यंत जातो, म्हणजे मोठ्या प्रमाणात उद्धृत केल्या जाणाऱ्या व बातम्यांमध्ये येणाऱ्या रकमेपेक्षा मुळातील खर्च १.३ पटींनी जास्त आहे. सरकारी कंपन्यांनी 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' (सीएसआर) निधीतून १४६.८३ कोटी रुपये खर्च केले, यावरून सुरू असलेला गोंधळही तितकाच अस्वस्थकारक आहे. 'कंपनी अधिनियम, २०१३'मधील सातव्या सूचीनुसार राष्ट्रीय वारसा, कला व संस्कृती यांचं जतन करण्यासाठी सीएसआरद्वारे निधी पुरवता येतो, परंतु 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'साठी झालेला सीएसआरचा वापर म्हणजे पैशाचा अपव्यय आहे, असं सांगत भारताच्या महाअभिलेखापालांनी (कॅग: कॉम्प्ट्रोलर अँड ऑडिटर जनरल) या खर्चाला अपात्र ठरवलं आहे.

वल्लभभाई पटेल यांच्या वारशाचा अपहार करण्याचा आटोकाट प्रयत्न भारतीय जनता पक्ष (भाजप) व मोदी करत आहेत, त्यामागे विविध उद्दिष्टं सक्रिय आहेत. आपल्या भव्यतेच्या हव्यासाला 'वारशा'चा शिक्का मिळवण्याचा छुपा उद्देशही यात आहे का? पण सीएसआर निधीचा वापर अनुत्पादक कामांसाठी करणं, हे गंभीर शासकीय अपयश आहे; आणि अशा अपयशांपासून सार्वजनिक विवेकाचं लक्ष विचलित करण्यासाठी सरकारचे सध्याचे खटाटोप पुरेसे नाही. भारतातील सीएसआर खर्चाची वाढ अतिशय संथ राहिलेली आहे, पण या संदर्भात जो काही खर्च होतो त्यातील ६० टक्के सर्वसाधारणतः सामाजिक क्षेत्रांमध्ये जातो– आरोग्य, गरीबी निवारण, पाणी व स्वच्छता, शिक्षण व उपजीविका निर्मिती यांसारख्या प्रश्नांवर हे पैसे खर्च केले जातात. या धनसंचयातील पैसा घशात घातला, तर इतर अनेक पर्यायांसंदर्भात होणारा तोटा प्रचंड असतो– विशेषतः सामाजिक क्षेत्राच्या विकासातील राज्यसंस्थेची रोडावत चालेली भूमिका बघता त्यासाठीचा हा निधीस्रोतही कमी होणं हानिकारक ठरतं. गुजरातमध्येही २०१४–१५पासून पुढील चार वर्षांच्या कालखंडात एकूण अर्थसंकल्पीय खर्चाच्या तुलनेत सरकारचा विकासात्मक खर्च ७० टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. याउलट विकासोत्तर कामकाजावरील खर्च ३० टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर गेला आहे. या पार्श्वभूमीवर, 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' प्रकल्पातील आपल्या सहभागाचं समर्थन करण्यासाठी सोयीस्कररित्या (क्षेत्रीय जोडणीद्वारे) रोजगारनिर्मितीचा दावा करणारे भाजप, मोदी व अगदी सरकारी कंपन्या आणि कॉर्पोरेट क्षेत्र स्वतःचा बचाव कशाच्या आधारे करणार आहेत? एकूणच अर्थव्यवस्थेला व्यापून असलेल्या बेरोजगारीच्या प्रश्नावर तोडगा काढण्याबाबत राजकीय इच्छाशक्तीची वानवा असल्याचं दिसतं. दुसरीकडे, सरकारच्याच परसदारी प्रचंड प्रमाणात पदभरती प्रलंबित आहे. फसवे आर्थिक तर्क मांडून या उणिवांवर पांघरूण घालता येणार नाही.

या दाव्यांचा पोकळपणा लपत नाही. विशेषतः परिघावरील समाजघटकांबाबत सरकारला सहानुभूती वाटत असल्याचं मिथक तर निराधारच ठरतं. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था उभारण्यासाठी वेगानं खर्चाची तरतूद केली जाते, पण 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या आदिवासी गावांना सामाजिक पाठिंबा द्यायचा मुद्दा येतो, तेव्हा त्यांच्याकडे पाठ फिरवण्याची भूमिका घेतली जाते. सरदार सरोवर प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या आदिवासी स्थलांतरितांच्या गतअनुभवांवरून हे स्पष्ट झालेलं आहे की, योग्य सामाजिक पाठबळ नसेल तर भरघोस नुकसानभरपाईसुद्धा दीर्घकालीनदृष्ट्या अकार्यक्षम ठरते. कोणतंही सामाजिक, राजकीय वा आर्थिक भांडवल नसलेल्या अथवा विविध सरकारी योजनांपर्यंत पोहोच नसलेल्या या आदिवासी समुदायांना एकंतर सामाजिक–आर्थिक यंत्रणेत चिरडून जावं लागतं. अशा वंचनेच्या कल्पित खर्चांचाही हिशेब तर 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' पुतळ्याची किंमत कित्येक पटींनी वाढेल.

लोकांना आपलं सामाजिक मूल्य समजून येण्यासाठी

आदर्श अर्थाने 'ऐक्य' (युनिटी) ही संकल्पना अमूल्य असते. पण भाजपला 'ऐक्य' या शब्दामध्ये ठोस आदर्श आशय भरण्याची इच्छा तरी आहे का? पुतळ्याला 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' असं नाव देणं हा राजकीय शब्दविपर्यस्ततेचा नमुना आहे. विद्यमान सरकारचं ध्रुवीकरणाचं राजकारण लपवण्याचा हा प्रयत्न आहे. वास्तविक पटेल यांच्या ऐक्याच्या विचारसरणीला धडधडीतपणे छेद देण्याचं काम हे सरकार करतं आहे. वित्तीय समावेशकता, काळ्या पैशावरील हल्ला व औद्योगिक क्षेत्रातील दिवाळखोरीला पायबंद, अशा मुद्द्यांचा वापर करून आर्थिक धोरणांची आक्रमक अंमलबजावणी या सरकारनं केली. कॉर्पोरेट क्षेत्राबाबत आश्रयदातृत्वाची भूमिका घेऊन सर्वसामान्य लोकांना नियमपालनाच्या नावाखाली दडपण्याचा प्रयत्न या धोरणांमधून झाल्याचं जनतेच्या अनुभवांवरून दिसून येतं.

पुतळ्याच्या प्रकल्पातही कास्याचं आच्छादन चीनकडून करवून घेण्यात आलं, त्यावेळी सरकारच्या विशेष 'मेक इन इंडिया' उपक्रमाचं पालन करण्याचे कोणतेही आदेश नोकरशाहीकडून पुतळानिर्मिती करणाऱ्या अभियांत्रिकी कंपनीला देण्यात आले नाहीत. परंतु, सरदार सरोवराच्या पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांना अशा भव्यतेच्या राजकीय हव्यासासमोर मुकाट्यानं मान तुकवावी लागली : मंजूर झालेल्या ९०,३८९ किलोमीटरच्या कालवे जाळ्यापैकी २० टक्के भाग आणि १७.९२ लाख हेक्टर शेतजमिनीपैकी ७५ टक्के जमिनीला होणारे सिंचनाचे लाभ, यांवर तिथल्या शेतकऱ्यांना पाणी सोडावं लागलं. पटेल यांनी आदर्शवत मानलेल्या मूल्यांबाबत इतकी बेपर्वाई दाखवूनही त्यांचा वारसा अपहृत करायचा भपकेबाज प्रयत्न केवळ पक्षपाती लाभासाठी आहे. याचे राष्ट्राच्या कल्याणावर अनिष्ट परिणाम होतील.

●

## शेतकरी आणि त्यांचं राष्ट्र

*शेतकऱ्यांच्या समस्यांना राष्ट्रानं प्रतिसाद द्यायला हवा; हे राष्ट्र सोडून न जायचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे.*

जवळपास दोनशे शेतकरी संघटनांचा समावेश असलेली अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समिती गेले काही महिने 'दिल्ली चलो' मोर्चासाठी शेतकऱ्यांना एकत्र आणते आहे. २९ व ३० नोव्हेंबरला राजधानीमध्ये पोचण्याची त्यांची योजना आहे. देशातील शेतकी संकटाची चर्चा करण्यासाठी संसदेच्या विशेष सत्राचं आयोजन करावं, ही समन्वय समितीची मुख्य मागणी आहे. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसी, किमान हमीभावाच्या धोरणाची अंमलबजावणी व नियमन, पीक विमा धोरणाच्या खाजगीकरणाची समस्या, दुष्काळग्रस्त क्षेत्राची नोंद करताना सरकारकडून वापरल्या जाणाऱ्या त्रुटीपूर्ण पद्धती, आणि विविध बँकांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांबाबत बँकांकडून घेतली जाणारी भेदभावाची भूमिका, इत्यादी मुद्द्यांवर या सत्रामध्ये चर्चा व्हावी, असं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. कर्ज वसूल करण्यासाठी काही बँकांनी कठोर व मानहानिकारक उपाय योजल्याचं शेतकऱ्यांच्या अनुभवावरून दिसतं. विशेष म्हणजे कित्येक हजारो कोटी रुपयांची कर्ज बुडवणाऱ्या विशिष्ट व्यक्तींबाबत मात्र याच बँकांनी उदार दृष्टिकोन अंगिकारलेला दिसतो. बँकांच्या या भेदभावाला मोठ्या संख्येनं शेतकरी बळी पडले आहेत.

किमान हमीभावाची व्यवहार्यता आपल्याला लाभदायक असेल का, याविषयीही शेतकरी साशंक आहेत. हमीभावाद्वारे बाजारपेठेच्या अस्थिरतेपासून मुक्तता मिळेल का, असा प्रश्न शेतकरी पूर्वीपासून

विचारत आहेत. बाजारपेठेवर खाजगी घटकांचं नियंत्रण असतं आणि या घटकांना मुख्यत्वे मोठा नफा कमावण्यात रस असतो. त्याचप्रमाणे नगदी पिकांवर खाजगी विमा कंपन्यांचा वाढता विळखा शेतकऱ्यांपेक्षा संबंधित कंपन्यांनाच लाभाचा ठरेल, अशी साधार भीतीही शेतकऱ्यांना वाटते आहे. जलसाठ्यांबाबतच्या 'रिमोट सेन्सिंग' पद्धतीद्वारे अचूक चित्र स्पष्ट होत नाही, असंही त्यांचं म्हणणं आहे. या सर्व घटकांमुळे शेतकी संकट निर्माण झालं आहे आणि या संकटाच्या गर्तेत सापडल्यामुळे तीन लाखांहून अधिक शेतकऱ्यांना शोकांतिक आत्महत्या कराव्या लागल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर, शेतकरी मोर्चाद्वारे शेतकी संकटाचा मुद्दा सार्वजनिक चर्चेत मध्यवर्ती स्थानी आणण्याचा प्रयत्न होतो आहे. सरकारला लोकशाही संवाद साधायला भाग पाडण्याचं या आंदोलनाचं उद्दिष्ट आहे. परंतु, हे सरकार शेतीप्रश्न सोडवण्याबाबत सर्वांत कमी आस्था बाळगून आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या अधिकृत खात्यामध्ये शेतकऱ्यांच्या समस्या 'पाहुण्यासारख्या अवतरून' जातात किंवा त्यांच्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केलं जातं, असं प्रतिपादन करण्यात आलेलं आहे. छापील व इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील विस्तृत व महागड्या जाहिरातींमध्ये चकचकीतपणे सादर करण्यात आलेल्या अधिकृत कथनांमधून खरं तर शेतकरी आत्महत्यांच्या शोकांतिक सत्याची विटंबनाच केलेली असते.

हा मुद्दा संसदेत चर्चेला घेण्यासाठी सरकार का तयार नाही, याचं कारण शोधणंही अवघड नाही. शेतीप्रश्न हाताळण्यात आपल्याला अपयश आल्याचं मान्य करणं सरकारला भाग पडेल. किंबहुना, कॉर्पोरेट हितसंबंधांसाठी शेतीसंकटाकडे सरकारनं दुर्लक्ष केलं, किंबहुना ही परिस्थिती शेतकऱ्यांसाठी अधिक दुःसह केली, हे सिद्ध होईल अशी भीती केंद्रातील सत्ताधाऱ्यांना वाटते आहे.

हे आंदोलन अनेक अर्थांनी महत्त्वाचं आहे. शरद जोशींच्या शेतकरी संटनेच्या नेतृत्वाखाली झालेल्या आधीच्या शेतकरी आंदोलनांपेक्षा या आंदोलनाचं स्वरूप वेगळं राहील असं दिसतं आहे. जोशी यांनी केलेल्या 'इंडिया विरुद्ध भारत' या द्वैतावर आधारित मांडणीद्वारे शेतकऱ्यांना संघटित करण्याचा प्रयत्न शेतकरी संघटनेनं केला. उपभोक्तावादी नागरी मध्यमवर्गावर जोशी यांनी टीका केली. ग्रामीण भारतातील कष्टकरी व शेतकरी वर्गाच्या त्यागावर नागरी मध्यमवर्गाची जीवनशैली ताव मारते, असा त्यांचा युक्तिवाद होता. अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समितीचं आंदोलन या द्वैती मांडणीपलीकडे जाण्यात यशस्वी झालं आहे आणि नागरी मध्यमवर्गाचा पाठिंबाही त्यांनी मिळवला आहे. या आंदोलनाचं स्वरूप बहुवर्गीय आहे, त्याच्या समर्थकांमध्ये विद्यार्थी, कलावंत, चित्रपट निर्माते, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक व बँक कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. मार्च २०१८मध्ये नाशिकहून मुंबईकडे गेलेल्या ऐतिहासिक व यशस्वी शेतकरी मोर्च्याच्या वेळीही हा बहुवर्गीय पाठिंबा दिसून आला होता.

दोन, सरकारनं विशेष सत्र बोलवावं यासाठी शेतकऱ्यांकडून होत असलेले प्रयत्न न्याय्यही आहेत. सरकारकडे या संदर्भात काही युक्तिवाद करण्यासारखे असतीलच तर ते सत्याच्या जवळ आहेत की असत्याच्या, हे सिद्ध करण्याची वाजवी संधी सरकारला द्यायला हवी, असं शेतकऱ्यांना वाटतं. तीन, या संकटाची चर्चा होण्यासाठी आवश्यक ज्ञानमीमांसक पार्श्वभूमी पुरवण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घेतला आहे.

हे राष्ट्र केवळ प्रतीकात्मक अर्थानं शेतकऱ्यांचं आहे, पण खऱ्या भौतिक संदर्भात हे राष्ट्र कॉर्पोरेट हितसंबंधांचंच आहे, हे सरकारला आणि या देशाच्या लोकांना सूचित करण्याचाही शेतकऱ्यांचा प्रयत्न आहे. जमीन, पाणी, वनं व खनिजं यांसारख्या शेतकी स्त्रोतांच्या वाढत्या खाजगीकरणातून हे स्पष्ट होतं. सरकारचं पाठबळ असलेल्या खाजगी कंपन्या वित्तपुरवठा, बियाणं, खतं व खुद्द बाजारपेठ या सर्व घटकांवर नियंत्रण मिळवून

शेतीभोवतीचा विळखा घट्ट करत आहेत. शेतकऱ्यांचं अस्तित्वही महत्त्वाचं आहे, स्वतःच्या जीवनाला आकार देण्याचा समान अधिकार त्यांना आहे, आणि राष्ट्राची प्रतिष्ठा जपायची असेल तर शेतकऱ्यांना स्वतःचा जीव घेणं भाग पडणार नाही अशी परिस्थिती निर्माण व्हायला हवी, हे शासकवर्गाच्या ध्यानात आणून देण्याचं या मोर्चाचं उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांनी संसदेच्या विशेष सत्राची मागणी केली आहे. शेतकी संकट हाताळण्यात या सरकारला अपयश आलं आहे, त्यामुळं अशा सत्रात काही चर्चा झालीच, तर या अपयशाची जबाबदारी सरकारला स्वीकारावीच लागेल.

●

## भव्यतेचा भ्रम

*आपापलं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी सरकार व रिझर्व बँक यांच्यात सुरू असलेल्या संघर्षात आर्थिक तारतम्याबाबत तडजोड केली जाते आहे.*

भारतीय रिझर्व बँक व केंद्र सरकार यांच्यात अलीकडेच झालेल्या वादाच्या निमित्ताने, वित्तव्यवस्थेच्या कामकाजासोबतच एकूणच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी हानिकारक ठरणाऱ्या प्रतिगामी स्थूल धोरणांची साखळी उघड्यावर आली आहे. रिझर्व बँकेचे उप-गव्हर्नर विरल आचार्य यांच्या वादग्रस्त सार्वजनिक व्याख्यानाचं विच्छेदन केलं असता, असं स्पष्ट होतं की, रिझर्व बँकेचे पदाधिकारी देशाच्या अर्थव्यवस्थेविषयी दूरदर्शी दृष्टिकोन ठेवतात आणि ही बँक स्वायत्त आहे व राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपापासून मुक्त आहे, हे दावे पोकळ पायावर उभे आहेत. एक, अल्पकालीन चलवाढीच्या मुद्द्यांबाबत रिझर्व बँकेला अवाजवी आस्था असते, आणि दीर्घकालीन विकासविषयक आस्थेचे प्रश्न दुर्लक्षिण्याकडे बँकेचा कल आहे, हे बरेचदा दिसून आलेलं आहे. दोन, 'स्वातंत्र्य/स्वायत्तता' ही संकल्पना रिझर्व बँकेच्या संदर्भात काटछाट करून वापरलेली दिसते. यामध्ये राज्यसंस्थेपासूनच्या स्वातंत्र्यावर अतिरिक्त भर दिलेला आहे, पण बाजारपेठा व कॉर्पोरेटविश्व (किंवा उप-गव्हर्नर म्हणतात त्याप्रमाण 'बाजारपेठांचा रोष') हे आर्थिक निर्णयप्रक्रियेसंबंधीचे बंधनकारक घटक आहेत याबाबत बोललं जात नाही. सामाजिक विचारविषयांबाबत कोणतंच स्वातंत्र्य हे अर्थातच सर्वंकष स्वरूपाचं नसतं.

नोकरशाहीच्या वाढत्या प्रभावासोबत वित्तीय समावेशकतेची हमी देण्यात रिझर्व बँकेला कायमच अपयश आलेलं आहे, हे नाकारता येणार नाही. अग्रक्रमावरील क्षेत्रांना किंवा दुर्बल समाजघटकांना कर्जपुरवठा करणं यांसारख्या सामाजिकदृष्ट्या लाभदायक बँकिंग कार्यक्रमांची अंमलबजावणी निष्काळजीपणे केली जाते, त्यासंबंधी योग्य सामाजिक लेखापरीक्षण केलं जात नाही. किंबहुना, १९९०च्या दशकापासून रिझर्व बँकेनं नव-अभिजातवादी स्थूल धोरणात्मक चौकट स्वीकारली आणि वित्तीय दृढीकरण साधलं. सार्वजनिक खर्चामध्ये व प्रत्यक्ष कराच्या दरांमध्ये कपात करणं, यांवर या दृढीकरण प्रक्रियेत भर देण्यात आला, त्यामुळे सामाजिक/विकासात्मक खर्च आकुंचित पावला, परिणामी विशेषतः नागरी भागांमध्ये विषमता वाढली. रिझर्व बँकेच्या प्रयत्नांशिवायच इतक्या आक्रमक वित्तीय दृढीकरणाला सरकारी कायद्यांचं रूप आलं, हे शक्य नाही. 'वित्तीय जबाबदारी व अर्थसंकल्प व्यवस्थापन अधिनियम, २००३' आणि 'आर्थिक धोरण रूपरेषा करार' हे दोन दस्तावेज भारत सरकार व भारतीय रिझर्व बँक यांच्यातील कराराद्वारे अस्तित्वात आलेले आहेत. एवढंच नव्हे तर 'भारतीय रिझर्व बँक अधिनियमा'त दुरुस्ती करून या दस्तावेजांचा त्यात समावेश करण्यात आला. भारत हा कमी कर आकारणारा आणि कमी

सार्वजनिक खर्च करणारा देश आहे, अशी जागतिक प्रतिमा यातून निर्माण झाली. शिवाय, इतर देशांच्या तुलनेत भारतातील बँक पतपुरवठा व सकल घरेलू उत्पन्न (जीडीपी: ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) यांच्यातील गुणोत्तर अतिशय कमी आहे, हा मुद्दाही पूरक ठरला. एन. के. सिंग समितीच्या शिफारसींनुसार केंद्र सरकारचं कर्ज व जीडीपी यांच्यातील गुणोत्तर २०२४-२५ सालापर्यंत ४० टक्क्यांवर खाली आणलं की ही प्रतिमा आणखी दृढ होईल. अशा प्रकारचं आक्रमक वित्तीय दृढीकरण हे 'किमान सरकारी अस्तित्व व कमाल शासन' या विद्यमान सरकारच्या विचारसरणीय भूमिकेत बसणारंच आहे.

अशा कठोर स्थूल-आर्थिक धोरणात्मक वातावरणात राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं निश्चलनीकरणासारखी 'धाडसी' पावलं उचलली आणि वस्तू व सेवा कराची (जीएसटी: गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स) सक्तीनं अंमलबजावणी केली. यामुळेच सध्याची अस्थिर आर्थिक अवस्था निर्माण झाली आहे. देशात अधिक रोजगाराच्या संधी उत्पन्न करण्यासाठी अतिशय महत्त्वाच्या असलेल्या लघुउद्योग व असंघटित क्षेत्रांमध्ये ही अस्थिरता विशेषकरून जाणवते. विविध प्रतिगामी स्थूल-आर्थिक धोरणांचा संयोग म्हणून घरगुती बचत व गुंतवणूक खालावली आहे, वित्तीय ताण वाढला आहे आणि चालू खात्यातील तूटही वाढली आहे. मुख्य म्हणजे रोजगारवाढही हलाखीच्या अवस्थेत आहे. अशा गंभीर समस्या समोर असल्यामुळे येत्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विद्यमान सरकारचा आत्मविश्वास डळमळला आहे. आपली असहाय अवस्था बाजूला सारण्यासाठी सरकार रिझर्व बँकेची खुशामत करण्याच्या प्रयत्नात आहे का?

ऊर्जा क्षेत्रासाठी कर्जाच्या अटी; बँकिंगबाह्य वित्तीय कंपन्यांना रोकडसुलभतेसंबंधी सहकार्य करण्यासाठी नियमाधारित तरतुदी; लघु व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांना कर्जपुरवठा करण्यासंबंधीचे नियम; आणि अव्यवहार्य प्रमाणात निष्क्रिय संपत्ती राखून असलेल्या सरकारी बँकांवर तत्काळ सुधारणात्मक कारवाईची यंत्रणा- यांसारखी गुन्हेगारीविरोधी धोरणं/नियम आखून वित्तीय व्यवस्थांची व्यवहार्यता पुनर्स्थापित करण्याचा रिझर्व बँकेचा प्रयत्न असल्याचं सांगितलं जात होतं. मुख्यत्वे हीच धोरणं सरकार व रिझर्व बँक यांच्यातील वादाला कारणीभूत होती. बँकेच्या मंडळाची भूमिका, वित्तीय तफावत भरून काढण्यासाठी बँकेकडील कथित अतिरिक्त राखीव रकमेचा वापर, आणि बँक स्रोतांमधील मोठ्या रकमा मोकळ्या करण्यासाठी जोखीमग्रस्त संपत्तीच्या ९ टक्के एवढी भांडवली पर्याप्तता निश्चित करण्याचा बँकेचा निर्णय (बँकिंग पर्यवेक्षणाविषयीच्या बेसल समितीनं ८ टक्क्यांची शिफारस केली होती), हेही मुद्दे या वादाला खतपाणी घालत होते.

त्या-त्या मुद्द्याची योग्यता लक्षात न घेता निर्णय घेण्याची चुकीची सक्ती केंद्र सरकार रिझर्व बँकेवर करत असल्याचं या वादातून उघड झालं आहे. शिवाय, बँकेच्या स्वायत्ततेविषयी काडीचाही आदर न दाखवणारी अहंकारी भूमिकाही सरकारनं घेतल्याचं दिसतं. उदाहरणार्थ, लघु व मध्यम उद्योगांच्या रोकडसुलभतेमध्ये व बँक पतपुरवठ्यामध्ये विस्तार करता येणार नाही असं नाही, पण या उद्योगांना '५९ मिनिटांमध्ये एक कोटी रुपयांपर्यंत बँक लोन मिळेल' अशा घोषणा अतिशय अनुचित आहेत. यापूर्वी सरकारनं केलेल्या हस्तक्षेपांमुळे बँकिंग व्यवस्था गंभीर संकटात सापडली होती, हे नजरेआड करता येणार नाही व करू नये. रिझर्व बँक मंडळाच्या भूमिकेसारखे आनुषंगिक मुद्दे हाताळताना सरकारनं लक्षात घ्यायला हवं की, हे मंडळ केवळ सल्लागार स्वरूपाचं आहे, कंपनी अधिनियमाप्रमाणे स्थापन झालेलं हे मंडळ नव्हे. आर्थिक व बँकिंग संदर्भातील धोरणांबाबत कोणतेही आदेश या मंडळाला देता येत नाहीत, किंवा तांत्रिक संदर्भ असलेल्या निर्णयांमध्ये या मंडळाला हस्तक्षेपही करता येत नाही. रिझर्व बँकेकडील राखीव साठ्याच्या व्याप्तीचा मुद्दा तीन समित्यांनी हाताळला आहे. 'विविध

धोक्यां'पासून संरक्षण व्हावं व आघातप्रतिबंधक उपाय योजता यावेत, यासाठी एकूण संपत्तीच्या १२ टक्के रक्कम किमान हस्तांतरणीय सकल नफा म्हणून आकस्मिकता साठ्याकडे वळती करता येईल, असा नियम स्वीकारण्यात आला. त्यामुळे आकस्मिकता साठ्याच्या पावित्र्याचा आदर करायला हवा. परंतु, भांडवली पर्याप्ततेच्या मुद्द्यावर बँकेला सौम्य धोरण घेणं शक्य आहे. किंबहुना, लोककल्याणाच्या संदर्भात सरकारच्या विचारांमध्ये रुजलेली व्यापक मूल्यं रिझर्व बँकेनंही आत्मसात करायला हवीत.

●

---

## हाशिमपुराचे धडे

*हाशिमपुरामधील कोठडीत झालेलं भयंकर हत्याकांड विस्मृतीत जाता कामा नये.*

उत्तर प्रदेश प्रांतिक सशस्त्र पोलीस दलानं १९८७ साली हाशिमपुरामध्ये ३८ मुस्लीम पुरुषांची हत्या केली होती, ही घटना विस्मृतीच्या पोकळीत ढकलून पुढे निघून जाणं हा त्यावरचा उपाय नाही. त्यामुळे, या घटनेसंबंधी दिल्ली उच्च न्यायालयानं अलीकडेच (हत्याकांडाला ३१ वर्षं उलटल्यानंतर) दिलेला निवाडा चर्चेला घेणं गरजेचं आहे. अंगावर काटा आणणाऱ्या या घटनेच्या स्मृतींमधून भारतीय समाज व राज्यव्यवस्थेनं धडा शिकायला हवा. या हत्याकाडांसंदर्भात १६ निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना (सुनावणीच्या वर्षांमध्ये इतर तिघांचा मृत्यू झाला आहे) जन्मठेपेची शिक्षा सुनावताना दिल्ली उच्च न्यायालयानं असं म्हटलं आहे की, या प्रकरणात 'कायदा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचा पूर्वग्रह उघड झाला आहे.' कोठड्यांमधील व संस्थांत्मक हिंसाचाराच्या बातम्यांना सरावलेल्या राष्ट्रालाही हाशिमपुरा हत्याकांडातील निर्ढावलेपणा व मुस्लीमद्वेष धक्कादायक वाटला होता.

किंबहुना, गेल्या तीन दशकांमध्ये राज्यसंस्था व उत्तर प्रदेश पोलीस आणि त्यानंतरचं प्रत्येक राज्य सरकार सुनावण्यांमध्ये पक्षकार झालेलं आहे. कनिष्ठ न्यायालयातील सुनावणीत या पोलीस कर्मचाऱ्यांना दोषमुक्त करण्यात आलं होतं, त्यानंतर उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत आरोपींना दोषी ठरवण्यासोबतच या घटनेबाबतच्या पोलिसी तपासप्रक्रियेवरही ताशेरे ओढण्यात आले. या देशातील कोठड्यांमध्ये होणाऱ्या मृत्यूंची आकडेवारी धोकादायक आहे, त्यातून एकच प्रश्न वारंवार उपस्थित होतो : पोलिसांवर कोणाचा वचक असेल?

पुन्हा एकदा उच्च न्यायालयानं नमूद केल्यानुसार, कोठडीतील या हत्याकांडामध्ये 'मानवाधिकारविषयक अत्याचार करणाऱ्या अपराध्यांवर परिणामकारक कारवाई करण्यात कायदाव्यवस्थेलाही अपयश आलं.' हाशिमपुरा घटनेतून धडा घेऊन त्यानुसार कृती केली नाही, तर भविष्यातही अशी प्रकरणं होतच राहतील, असं म्हणणं निराशावादी वाटत असलं तरी ते वास्तवदर्शीही आहेच. या दीर्घ कायदेशीर लढाईत सहभागी झालेले मानवाधिकार कार्यकर्ते व वकील यांनी निदर्शनास आणून दिल्यानुसार, ही कृती प्रांतिक पोलीस दलातील कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या विचारांनी केली असणं शक्य नाही. हेही जुनंच दुखणं आहे. कोठडीतील हिंसाचारामध्ये सहभागी घटकांना शिक्षा झाली असली, तरी खरे सूत्रधार मोकळेच आहेत.

नागरिकांच्या मानवाधिकारांचं रक्षण करण्याची घटनात्मक जबाबदारी असलेल्या संस्थाच या अधिकारांची पायमल्ली करतात. दुर्दैवानं ही बाब गतकाळापुरती मर्यादित नाही. पीडित समुदाय व गटांविरोधातील बेलगाम क्रौर्याच्या व हिंसाचाराच्या या विविध घटनांद्वारे सदर संस्थांचा ऱ्हास सुरूच आहे.

हाशिमपुरा प्रकरणाचे धडे लक्षात ठेवून त्यावर चर्चा करणं ही म्हणूनच सध्याची निकड आहे.

परंतु, हत्याकाडांत बळी पडलेल्या व त्या जमातीय हिंसाचारातून बचावलेल्या माणसांचे कुटुंबीय व समर्थक यांचं मनोबळ व न्यायिक व्यवस्थेवर त्यांनी दाखवलेला विश्वास यांची दखल घेणंही अत्यावश्यक आहे. पोलिसांनी ज्या परिसरातून या लोकांना उचललं त्या संपूर्ण परिसरावरच धोकादायक व राष्ट्रविरोधी असल्याचा ठपका ठेवण्यात आला होता, असं विविध माध्यमांनी व वकिलांनी दाखवून दिलं आहे. तरीही, या पुरुषांची झडती घेण्यात आली तेव्हा कोणतीही तत्काळ प्रतिक्रिया उमटली नाही, कोणतीही शस्त्रास्त्रं सापडली नाहीत. त्यांचं खलचित्रण करायचे सर्व प्रयत्न खोटे पडले. या आपत्तीतून बचावलेल्यांना कनिष्ठ न्यायालयात विपरित निकालाला सामोरं जावं लागलं, त्यांच्या उपजीविकेवर व त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर याचा परिणाम झाला, शिवाय भावनिक व मानसिक ताण पडला, तरीही त्यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा सुरूच ठेवला. काही निग्रही वकिलांनी -यात महिलांचाही समावेश होता- त्यांची बाजू कार्यक्षमतेनं न्यायालयात मांडली आणि हार मानायला नकार दिला. किंबहुना, या चिकाटीमुळेच अखेरीस आरोपी पोलिसांना प्रत्यक्ष हत्याकांडाशी जोडणारा पुरावा 'सापडला'. हे बचावलेले लोक, वकील व काही मोजक्या माध्यमांनी न्याय मिळण्याची आशा व श्रद्धा तेवती ठेवली, याबद्दल या सर्वांचं कौतुक करायला हवं.

हे प्रकरण म्हणजे बाजूला झटकून टाकता येईल अशा अपवादाचं नव्हतं. या हिंसाचाराचा फटका बसलेल्या कुटुंबांनी केलेल्या विविध मागण्यांकडे लक्ष दिलं जायला हवं. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एका पोलीस अधिकाऱ्यानं या प्रकरणाचं वर्णन 'स्वतंत्र भारतामधील सर्वांत भीषण कोठडी-हत्या' असं केलं होतं. अशा घटनेची स्मृती माध्यमांनी व राष्ट्राच्या भवितव्याची चिंता असलेल्या नागरिकांनी जागी ठेवली, तर उपरोल्लेखित कुटुंबीयांच्या मागण्यांची दखल घेतली जाईल.

हाशिमपुरातील मुस्लीम समुदायाच्या सामूहिक इतिहासातील ही घटना न विसरता येणारी आहे. या घटनेचे तपशील त्या समुदायाच्या स्मृतीमध्ये कोरले गेले असतील. व्यापक जनतेच्या स्मृतीमध्येही ही घटना ठसवणं महत्त्वाचं आहे. इतिहासाचा विसर पडलेले लोक विनाशकारी इतिहासाची पुनरावृत्ती करत राहतात, हा अगदी स्वाभाविक पण तितकाच दुर्लक्षिलेला धडा आहे. ●

## आयुष्यमान भारत- खाजगी आरोग्यसेवेच्या दीर्घायुष्यासाठी

*'आयुष्मान भारत'- राष्ट्रीय आरोग्य संरक्षण अभियानाचं टिकून राहाणं अवघड आहे.*

मानवी भांडवलाच्या विकासामध्ये सुदृढ लोकसंख्येचं मोठं योगदान असतं आणि मानवी भांडवल हा आर्थिक वृद्धीचा प्राथमिक घटक आहे. जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार, भारतामध्ये सकल घरेलू उत्पन्नाच्या (जीडीपी: ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) तुलनेत आरोग्यावरील खर्च २०१५ साली ३.८ टक्के होता. अमेरिकेमधील ही आकडेवारी १६.८ टक्के होती, तर उर्वरित जगाचं आरोग्यावरील खर्चाचं एकत्रित प्रमाण ९.९ टक्के होतं. भारतातील १५ टक्के जनतेचा आरोग्यविमा उतरवलेला आहे, आणि आरोग्यावरील ९४ टक्के खर्च हा संबंधित व्यक्ती थेट स्वतःच्या खिशातून करतात. त्यामुळे आरोग्यासंबंधीची धक्कादायक घटना व्यक्तींना व कुटुंबांना कायमस्वरूपी कर्जाच्या गर्तेत लोटू शकतो. गरीबांना आरोग्यविमा पुरवल्यास व्यक्तींचं आरोग्य सुधारेलच, शिवाय त्याचे इतरही काही सकारात्मक परिणाम होतील. कुटुंबांना गरीबीच्या विखारी चक्रातून बाहेर काढण्यासाठी

आरोग्यविमा कळीची भूमिका निभावू शकतो.

या पार्श्वभूमीवर, 'आयुष्मान भारत'– राष्ट्रीय आरोग्य संरक्षण अभियान ('मोदीकेअर' या नावानेही परिचित) बरीच उत्सुकता निर्माण करणारं ठरलं होतं. प्रत्येक कुटुंबाला पाच लाख रुपयांपर्यंतचा आरोग्यविमा पुरवण्यात येईल, असं अभियानाच्या सुरुवातीला सांगण्यात आलं. सामाजिक-आर्थिक जातीय जनगणनेच्या आकडेवारीनुसार लोकसंख्येतील गरीब व असुरक्षित घटकांमधील दहा कोटींहून अधिक कुटुंबांवर लक्ष केंद्रित करून या योजनेची अंमलबजावणी होणं अपेक्षित होतं. राष्ट्रीय स्वास्थ्यविमा योजनेसारख्या आधीच्या योजनांपेक्षा आयुष्मान भारतमध्ये काही मोठे बदलही केलेले होते. सरकारी आरोग्य केंद्रांचं अद्ययावतीकरण करून प्राथमिक आरोग्यसेवा पुरवण्याची तरतूद आयुष्मान भारतमध्ये आहे. विम्याची रक्कमही तीस हजार रुपयांवरून पाच लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेला डिजीटल रूप देण्याचंही घाटतं आहे. आंध्र प्रदेशातील राजीव आरोग्यसरी आरोग्य विमा योजनेवरून आयुष्मान भारतमधील या तरतुदींचं स्वरूप ठरलं. संपूर्ण लोकसंख्येतील ४० टक्के लोकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचं उद्दिष्ट सरकारनं स्वतःसमोर ठेवलं आहे.

मुळात ही योजना टिकाऊ कशी बनवायची, हा एक मोठा प्रश्न आहे. यातून वित्तीय तणावामध्ये भरच पडणार आहे. थेट लाभ हस्तांतरणाच्या प्रक्रियेतून केलेल्या बचतीद्वारे– ही रक्कम ९० हजार कोटी रुपये इतकी आहे– आपण आयुष्यमान भारत योजनेला निधी पुरवठा करू शकतो, असा दावा सरकारने केला आहे. परंतु, या पैशाची दखल वित्तीय आकडेमोडीत आधीच घेण्यात आली आहे. शिवाय, या योजनेवरील ४० टक्के खर्च राज्य सरकारांना पेलावा लागतो, त्यामुळे राज्यांवरील वित्तीय ताण वाढेल आणि त्यांच्याकडून केंद्र सरकारकडे अधिक स्रोतांची मागणी होण्याची शक्यता आहे. विशेषतः गरीबी रेषेखालील लोकसंख्येचं प्रमाण जास्त असलेल्या राज्यांसाठी ही मोठी समस्या ठरेल. परिणामी, हे धोरण गरीब राज्यांना जास्त थकवणारं ठरणार आहे.

आरोग्य क्षेत्रातील पायाभूत रचनांची अवस्था हीसुद्धा आणखी एक मोठी समस्या ठरू शकते. परिघावरील प्रदेशांच्या बाबतीत हा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो. सुमारे ८० टक्के डॉक्टर व ७५ टक्के दवाखाने नागरी भारतामध्ये सेवा देत आहेत, आणि नागरी प्रदेशांमध्ये केवळ २८ टक्के लोकसंख्या राहते. त्यामुळे उर्वरित भारतीय जनतेला प्राथमिक आरोग्य सुविधांची आत्यंतिक निकड भासते. भारतात दर हजार माणसांमागे रुग्णालयात सरासरी ०.९ पलंग उपलब्ध असतात. विकसित देशांमध्ये प्रति एक हजार लोकसंख्येसाठी ६.५ रुग्णालयीन पलंग उपलब्ध आहेत. भारतात दर हजार लोकसंख्येपाठी ०.६ डॉक्टर अस्तित्वात आहेत; तर विकसित देशांमध्ये याच प्रमाणासाठी तीन डॉक्टर उपलब्ध असतात. भारतातील केवळ ३७ टक्के लोकांना रुग्णाला दाखल करण्याची सुविधा पाच किलोमीटरच्या परिघात उपलब्ध होते, तर केवळ ६८ टक्के लोकांना रुग्ण तपासून घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार, २०१५ सालामध्येही १५ टक्के बालकांना प्राथमिक लसीकरण उपलब्ध नव्हतं.

सरकारी आरोग्य सेवांच्या अभावी खाजगी क्षेत्रावरील अवलंबित्व वाढतं. सार्वजनिक आरोग्य क्षेत्राचा चांगला विकास झालेल्या प्रदेशांमध्ये खाजगी आरोग्य सेवांचा खर्च कमी आहे, ही सर्वज्ञात वस्तुस्थिती आहे. उदाहरणार्थ, तामीळनाडूमध्ये खाजगी रुग्णालयांना सरकारी आरोग्य सेवांशी स्पर्धा करावी लागते, त्यामुळे सेवांच्या दर्जाच्या तुलनेत त्यावरील खर्च तुलनेने कमी असतो. या उलट, उत्तर भारतीय राज्यांमध्ये, खाजगी रुग्णालयांमधील खर्च खरोखरच गगनाला भिडण्याची शक्यता असते. शिवाय, अशा रुग्णालयांमधील वैद्यकीय गैरप्रकारांवर देखरेख ठेवणाऱ्या विश्वसनीय संस्थाही उपस्थित नाहीत. गैरव्यवहारांवर अंकुश ठेवला नाही,

तर विम्याची संपूर्ण रक्कम एका झटक्यात संपून जाणं सहज शक्य आहे. उदाहरणार्थ, एखाद्या प्राणघातक आजारातून जात असलेल्या रुग्णावर अनेक वेळा शस्त्रक्रिया केली जाऊ शकते. यानंतरही रुग्णाचा जीव जातोच, पण विम्याचं कवच नसेल तर संबंधित रुग्णाचे कुटुंबीय कर्जाच्या वेढ्यात अडकतात. एखाद्या महागड्या 'सुपर स्पेशालिटी' रुग्णालयात उपचार घेण्याचा खर्च गडगंज असतो.

त्याचबरोबर, सरकारी रुग्णालयांमधील डॉक्टरांवर देखरेख ठेवणंही गरजेचं आहे. सरकारी डॉक्टर अधिक नफादायक असलेला खाजगी व्यवसायसुद्धा करतात, हे सर्वज्ञात असतं. आरोग्यविम्यामध्ये खाजगी सुविधांचाच समावेश होत असल्यामुळे सरकारी डॉक्टरांना खाजगी व्यवसाय करणं अथवा खाजगी नर्सिंग होम सुरू करणं अधिक श्रेयस्कर वाटण्याची शक्यता वाढते.

शिवाय, विम्यासाठी जीव अधिक धोक्यात घालण्याची वृत्ती (मॉरल हॅझार्ड) लाभार्थ्यांसमोरच्या समस्यांमध्ये भर घालते. आपल्याला महागड्या खाजगी रुग्णालयांकडे जाता येऊ शकतं हे लक्षात आल्यावर लोक लहानशा आजारांसाठीही अशा सेवा वापरू शकतात. लोकांची बचत कमी होऊन सिगारेट व तंबाखू यांसारख्या धोकादायक खर्चांमध्ये वाढ होण्याचीही शक्यता असते. या सर्व बाजूंचा विचार करणाऱ्या देखरेख संस्थांची आवश्यकता आहे. 'आयुष्मान भारत' योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी या समस्यांचा अंदाज बांधलेला आहे का, आणि त्यांना आळा घालण्यासाठी त्यांनी काही पावलं उचललेली आहेत का, हे स्पष्ट झालेलं नाही.

'आयुष्यमान भारत' योजनेचं सामर्थ्य मोठं आहे, पण त्याची काळजीपूर्वक अंमलबजावणी झाली नाही तर ते दुःस्वप्न ठरू शकतं, असं म्हणता येईल. धोरणकर्त्यांनीही हे मुद्दे लक्षात ठेवण्याची गरज आहे. या विविध बाजूंचं विश्लेषण करण्यासाठी अधिक चांगल्या आकडेवारीचीही गरज आहे.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (१७ व २४ नोव्हेंबर २०१८ या अंकांतून)

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक लातूरमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अर्हन्त बुक डिस्ट्रिब्युशन

द्वारा विश्वदिप मेडिकल स्टोअर्स, एच. बी. टेकाळे,
तुळजाई हॉस्पिटलसमोर, प्रकाशनगर, लातूर
भ्र. ९७६७८०११४०

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक नांदेडमध्ये मिळण्याचे ठिकाण**

मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉम्प्लेक्स, हॉटेल ताज
पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक पुणे शहरात मिळण्याचे ठिकाण**

सनलाईट मीडिया डिस्ट्रीब्युशन

६३८, नारायण पेठ, पॉप्युलर हाऊस बिल्डिंग, दुकान क्र.३,
अप्पा बळवंत चौकाजवळ,
पुणे ४११०३०
भ्र. ९८५०६६२९८८

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक अकोल्यामध्ये मिळण्याचे ठिकाण**

हरिष बुक स्टॉल

न्यू बस स्टँड, अकोला
भ्र. ९८२२२३३२६४